# गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे
# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
# ता. पलूस जि. सांगली
# अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा
# विषयः पर्यटन व्यवसायातील संधी
# दि. ११/०२/२०१९

## अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात सोमवार दिनांक ११/०२/२०१९रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत "पर्यटन व्यवसायातील संधी" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात कार्यशाळेस मार्गदर्शक व्यक्ती म्हणून उपस्थित असणारे वक्ते शिक्षक विद्यार्थी यांची नाव नोंदणी चहा व अल्पोपहार आणि कार्यशाळेच्या उद्‌घाटनाचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. एस. जी. चवरे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयात सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात अग्रणी महाविद्यालय योजना व त्याचा हेतू, उद्देश आणि फलश्रुती याबाबत सविस्तरपणे संबोधित केले. कार्यशाळेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठ भूगोल विभागातील डॉ. एम. बी. पोतदार यांचे हस्ते झाले. त्यांनी पर्यटन व्यवसायात असलेल्या विविध संधींचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे हे होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अग्रणी विभाग प्रमुख प्रा. व्ही.,आर. माने यांनी मानले.

प्रथम सत्रामध्ये पर्यटन व्यवसायातील संधी या विषयावर शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागाच्या डॉ. एम. बी. पोतदार यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये पर्यटन क्षेत्रामध्ये सध्याच्या काळामध्ये वाढत्या संधी व या संधींची उपयुक्तता व्यक्त केली. या सत्राचे आभार डॉ. एम. जी. सदामते यांनी मानले.

दुसÚया सत्रामध्ये डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव येथील प्राध्यापक डॉ. विजय पाडळकर यांचे व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी पर्यटन व्यवसायाशी संबंधित असलेल्या विविध संधी विविध उदाहरणासहीत स्पष्ट केल्या तसेच पर्यटन व्यवसायाची भविष्यातील उपयुक्तता यावर आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार अग्रणी विभाग प्रमुख प्राध्यापक व्ही. आर. माने यांनी मानले.

यानंतर शाकाहारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. भोजनानंतर उपस्थितांना चहा पाणी व प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत-

कार्यशाळेची छायाचित्रे

**गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे**
**क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल**
**ता. पलूस जि. सांगली**
**अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा**
**विषयः लघुनाटिका प्रशिक्षण**
**दि. ११/०२/२०१९**

## अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात सोमवार दिनांक ११/०२/२०१९ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत लघुनाटिका प्रशिक्षण या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात कार्यशाळेस मार्गदर्शक व्यक्ती म्हणून उपस्थित असणारे वक्ते, शिक्षक विद्यार्थी यांची नाव नोंदणी चहा व अल्पोपहार आणि कार्यशाळेच्या उद्घाटनाचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे अग्रणी विभाग समन्वयक प्रा. व्ही. आर. माने यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयात सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात अग्रणी महाविद्यालय योजना व त्याचा हेतू, उद्देश आणि फलश्रुती याबाबत सविस्तरपणे संबोधित केले. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ भूगोल विभागातील डॉ. एम. बी. पोतदार यांचे हस्ते झाले. त्यांनी चित्रपट व नाट्या व्यवसायात असलेल्या विविध संधींचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम.  नलावडे हे होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अग्रणी विभाग सदस्य डॉ. एस. जी. चवरे यांनी मानले.

प्रथम सत्रामध्ये लघुनाटिका प्रशिक्षण या विषयावर श्री. अजित खाडे राहणार पलूस यांचे व्याख्यान झाले त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये लघुनाटिका प्रशिक्षण या विषयाचे या

विषयाचे महत्त्व विशद केले. या सत्रात त्यांनी उपस्थित विद्याथ्र्यांचे लघुनाटिका प्रात्यक्षिक घेतले.  या सत्राचे आभार कु. एस. पी. खरात यांनी मानले.

दुसÚया सत्रामध्ये बोरगााव येथील कु. एम. बी. साठे यांचे व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी चित्रपट व नाट्य व्यवसायात असलेल्या विविध संधींचा सविस्तर आढावा घेतला. कार्यक्रमाचे आभार अग्रणी विभाग सदस्य डॉ. एस. जी. चवरे यांनी मानले.

यानंतर शाकाहारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. भोजनानंतर उपस्थितांना चहा पाणी व प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत-

कार्यशाळेची छायाचित्रे